# 'स्वरमाधुरी' विषयी

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड शैक्षणिक यशाबरोबरच सांस्कृतिक आणि क्रीडाक्षेत्रातही अग्रेसर असते. २०१०-११ मध्ये नॅक पुनर्मूल्यांकन समितीने महाविद्यालयास 'अ' दर्जा बहाल केला आहे. पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २००८-०९चा 'उत्कृष्ट महाविद्यालय' हा पुरस्कार देऊन या महाविद्यालयास गौरविले आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. शंकरराव कानिटकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून 'स्वरमाधुरी' ही शास्त्रीय गायनस्पर्धा आमचे महाविद्यालय सातत्याने आयोजित करीत आहे. तरुणांमधील पाश्चिमात्य संगीताचा वाढता प्रभाव लक्षात घेता अभिजात भारतीय संगीताचा वारसा टिकविण्यासाठी आणि पुढे नेण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी समजल्या जाणाऱ्या पुणे येथील पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत घेतली जाणारी ही एकमेव आंतरमहाविद्यालयीन शास्त्रीय गायनस्पर्धा आहे. संस्थेच्या अमृतमहोत्सवानिमित्त (२००८-०९ पासून) ही स्पर्धा जास्त व्यापक करून त्यात मराठी नाट्यसंगीत गायनस्पर्धेचाही समावेश करण्यात आला आहे.



या स्पर्धेची लोकप्रियता आणि आगळेवेगळे स्वरूप लक्षात घेऊन पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने २००५-०६ पासून या स्पर्धेस आर्थिक साहाय्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या भौतिक प्रगतीला नैतिक आधार निर्माण करण्याचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्दिष्ट सुद्धा यात साध्य होताना दिसते. २००८-०९ पासून पुणे विद्यापिठाच्या 'विद्यावाणी' या एफ एम वाहिनीचे स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे.

डॉ. मालती पांडे-बर्वे, छोटा गंधर्व, गजानन वाटवे, पं. राम माटे, योगिनी जोगळेकर, डॉ. सुचेता भिडे-चापेकर, पं. जानोरीकर, डॉ. विकास कशाळकर, मधुवंती दांडेकर यांसारख्या अनेक नामवंत आणि लोकप्रिय कलाकारांनी परीक्षक अथवा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून या स्पर्धेस आपले आशीर्वाद दिले आहेत. या स्पर्धेतील अनुराधा कुबेर, पुष्कर लेले, आरती ठाकूर, सानिया पाटणकर, मंदार गाडगीळ... असे अनेक स्पर्धक उदयोन्मुख कलाकार म्हणून रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत.

## पारितोषिकांचे स्वरूप

### स्वरमाधुरी शास्त्रीय गायन स्पर्धा

प्रथम क्रमांक - कै. शंकरराव कानिटकर स्मृती करंडक (फिरता चषक)
कै. कुं. संगीता रवींद्र व्होरा यांच्या स्मरणार्थ रोख पारितोषिक रु. ३०००/-
व कै. सौ. विजया राजाराम जोशी यांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्ह.

द्वितीय क्रमांक - कै. पुरुषोत्तम विठ्ठल चिंचाळकर स्मरणार्थ रोख रु.२०००/-
व कै. मधुकर गोपाळ देशपांडे यांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्ह.

तृतीय क्रमांक - कै. केशव गोपाळ जोशी स्मरणार्थ रोख रु. १०००/-
व कै. मधुकर गोपाळ देशपांडे यांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्ह.

### स्वरमाधुरी नाट्यसंगीत गायनस्पर्धा

- प्रथम क्रमांक -
कै. शंकरराव कानिटकर स्मृती करंडक (फिरता चषक)
कै. श्री. गणेश हरी रानडे यांच्या स्मरणार्थ रोख रु. १५००/-
द्वितीय क्रमांक - रोख रु. १२००/-
कै. सरस्वतीबाई वैद्य यांच्या स्मरणार्थ
तृतीय क्रमांक - रोख रु.१०००/-
प्रा. सौ . श्रुती भातखंडे यांच्यातर्फे
स्मृतिचिन्हे प्राचार्य डॉ. संजय खरात यांच्यातर्फे

### सल्लागार समिती

◆ डॉ. दीपक माने ◆
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ

◆ डॉ. गजानन एकबोटे ◆
अध्यक्ष, नियामक मंडळ, प्रो. ए. सो., शिवाजीनगर, पुणे -५

◆ प्रा. प्रकाश दीक्षित ◆
उपकार्यवाह, प्रो.ए.सोसायटी,पुणे - ५
व्हिजिटर, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे-५३

◆ प्रा. सुरेश तोडकर ◆
सहकार्यवाह, प्रो.ए. सोसायटी., पुणे-५
अध्यक्ष, स्था. व्य. स., मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड पुणे-५३

◆ डॉ. संजय खरात ◆
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे - ५३

◆ डॉ. प्राची रावळ ◆
संयोजिका, 'स्वरमाधुरी'

## स्पर्धेची नियमावली

(१) महाराष्ट्र राज्यातल्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांचे पदवी व पदव्युत्तर विभागांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी या स्पर्धेत भाग घेऊ शकतील. बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

(२) एकच स्पर्धक दोन्ही स्पर्धांमध्ये स्वतंत्र नोंदणी करून भाग घेऊ शकतो. प्रत्येक स्पर्धेस वेगळी फी (रु. ५०/–) आहे. ती रोखीने किंवा डी.डी. ने स्वीकारली जाईल.

(३) स्पर्धकाने स्वतःच्या महाविद्यालयाचे ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे.

(४) शास्त्रीय गायनस्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकाला १५ मिनिटे वेळ दिला जाईल. सादर करावयाचा राग विलंबित व द्रुत अशा पद्धतीने मांडायचा आहे. स्पर्धकाने तानपुऱ्याची व्यवस्था स्वतः करावयाची आहे. इलेक्ट्रॉनिक तानपुरा वापरता येईल. तबला व हार्मोनियम साथीदारांची आवश्यकतेनुसार संयोजकांतर्फे व्यवस्था करण्यात येईल.

(५) नाट्यगीत गायनस्पर्धेसाठी जास्तीत जास्त ७ मिनिटे वेळ दिला जाईल. नाट्यगीत मराठी नाटकातलेच असले पाहिजे.

(६) गरजेनुसार स्पर्धेच्या नियमांत बदल करण्याचे अधिकार स्पर्धा समितीकडे राहतील.

(७) निवासाची व्यवस्था संयोजकांतर्फे होणार नाही.

(८) प्रवेश–अर्जाची झेरॉक्स प्रत भरून पाठवल्यास स्वीकारली जाईल.

(९) प्रवेश–अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १४/०१/२०१२

अधिक माहितीसाठी संपर्क :

- डॉ. प्राची रावळ : ९९६००३०८९१
  स्पर्धा समिती प्रमुख
- सौ. वर्षा जोशी
  पदार्थ विज्ञान विभाग, ९८५०८ ८६४६१
- सौ. श्रुती भातखंडे
  इतिहास विभाग, ९२७३३८६२३०
- महाविद्यालय : ०२०–२५६३४०२१ (फोन)
  ०२०–२५६५०९३१ (फॅक्स)
- विद्यार्थी कल्याण मंडळ :०२०–२५६०११५४(फोन)
  ०२०–२५६९७३४१(फॅक्स)

**www.moderncollegegk.org**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

# मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय

गणेशखिंड, पुणे – ५३

आणि

# विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# राज्यस्तरीय आंतरविद्यापीठीय शास्त्रीय आणि नाट्यसंगीत गायनस्पर्धा

# 'स्वरमाधुरी'

कै. शंकरराव कानिटकर स्मृती करंडक
शास्त्रीय गायनस्पर्धा

कै. शंकरराव कानिटकर स्मृती पारितोषिक
नाट्यसंगीत गायनस्पर्धा

स्पर्धा : मंगळवार दि. १७/०१/२०१२ आणि
बुधवार दि १८/१/२०१२ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून
बक्षीस वितरण समारंभ
दि. १८/१/२०१२ रोजी सायंकाळी ५ वा.

माध्यम प्रायोजक : विद्यावाणी रेडिओ, पुणे विद्यापीठ

स्थळ :

**मॉडर्न महाविद्यालय,**

गणेशखिंड, पुणे – ५३

**(नॅक मूल्यांकन 'अ' दर्जा)**

पाषाण रोड (पुणे विद्यापीठ गेटसमोर) येथील दृक्–श्राव्य सभागृह

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे ४११ ०५३

आणि

## विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

### राज्यस्तरीय आंतरविद्यापीठीय शास्त्रीय व नाट्यसंगीत गायनस्पर्धा

### प्रवेश अर्ज

स्पर्धकाचे नाव : ____________________

महाविद्यालयाचे नाव : ____________________

विद्यापीठाचे नाव : ____________________

महाविद्यालयाचा पत्ता : ____________________

____________________ फोन क्र. : ....................

स्पर्धकाचा पत्ता : ____________________

फोन क्र. .................... ईमेल : ....................

स्पर्धक भाग घेत असलेली स्पर्धा : ☐ शास्त्रीय ☐ नाट्यसंगीत ☐ दोन्ही

सादर करावयाचे राग :

१) ____________________ २) ____________________

सादर करावयाची नाट्यगीते व नाटकाचे नाव :

१) ____________________

२) ____________________

साथीदारांची व्यवस्था : ☐ हवी ☐ नको प्रवेश फी : (रु. ५०/-, रु. १००/-) रोख/डीडी*

डीडी क्रमांक : .................... बँकेचे नाव : ____________________

* प्राचार्य, मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे ५३ यांच्या नावे Payable at पुणे

- - - - - - - - - - - - - - - - - - - -

### प्रतिज्ञापत्र

* अर्जात भरलेली सर्व माहिती खरी असून त्याची मी पूर्ण जबाबदारी घेतो/घेते. * मी स्पर्धेचे नियम वाचले आहेत आणि मी स्पर्धेच्या नियमांचे पालन करेन. * परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील आणि तो मला मान्य असेल.

* कै. शंकरराव कानिटकर स्मृती पारितोषिक आणि /किंवा करंडक (फिरता चषक) मी पुढच्या वर्षी स्पर्धा सुरु होण्याच्या किमान २ महिने आधी मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे ४११ ०५३ येथे परत करेन.

स्पर्धकाची स्वाक्षरी

दिनांक : स्थळ : प्राचार्यांची स्वाक्षरी महाविद्यालयाचा शिक्का